लोकमत पृ. पान क्र. 1

# निवडणूक प्रचाराची सांगता, छुप्या प्रचाराला येणार वेग!

## आज खासगी गाठीभेटींवर जोर : उद्याच्या मतदानाकडे लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : वसई तालुक्यासह जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघांतील प्रचाराची सांगता सोमवारी संध्याकाळी सहा वाजता झाली. त्यासोबतच गेल्या १५ दिवसांपासून तालुक्यासह जिल्ह्यात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या धडाडणाऱ्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. आता २० तारीखपर्यंत छुप्या प्रचाराच्या माध्यमातून प्रत्येक पक्षाकडून रणनीती आखली जाणार आहे.

आता उमेदवारांना आणि मतदारांनाही २० नोव्हेंबर या मतदानाच्या दिवसाची प्रतीक्षा आहे. मतदानाच्या टक्केवारीवरून उमेदवारांच्या विजयाचे गणित समजणार आहे. दिवाळीनंतर प्रचाराला रंग चढला होता. अनेक राजकीय पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारात भाग घेतला.



पालघर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराच्या अखेरच्या दिवशी बहुजन विकास आघाडीसह अन्य पक्षांनी बाईक रॅली काढून मतदारांशी संपर्क साधला.

### अनुचित प्रकार नाही

बविआने आयोजित केलेल्या रॅलीत हास्य कलाकारांना सामील करून प्रचारात वेगळा रंग भरला. महायुती, महाआघाडी व बविआ यांच्यात प्रचारादरम्यान अनेक आरोप-प्रत्यारोपही झाले, मात्र काँग्रेस उमेदवारांचा फलक फाडल्याची घटना वगळता कोणताही अनुचित प्रकार तसेच कायदा व सुव्यवस्था प्रश्न प्रचारादरम्यान निर्माण झाला नाही.

### वसईत झाल्या सभा

भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी वसई विधानसभेच्या भाजप उमेदवार स्नेहा दुबे यांच्यासाठी रविवारी, तर काँग्रेसचे उमेदवार विजय पाटील यांच्या प्रचारासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सभा घेतली.

### राजकीय पक्षांनी राबवली प्रचार यंत्रणा

१ तालुक्यात वसई, नालासोपारा व बोईसर हे विधानसभा मतदारसंघ येत असून यामध्ये तिन्ही विद्यमान आमदार हे बहुजन विकास आघाडीचे आहेत. या निवडणुकीत मुख्य लढत ही बहुजन विकास आघाडी, महायुती व महाविकास आघाडी यांच्यात आहे.

२ मनसेनेही आपले उमेदवार या विधानसभा मतदारसंघात उतरवले आहेत. नालासोपारा मतदारसंघातून प्रहारचे धनंजय गावडेही मैदानात उतरले आहेत. वसईमध्ये बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर, काँग्रेसचे विजय पाटील व भाजपच्या स्नेहा दुबे यांच्यात लढत होत आहे.

३ नालासोपाऱ्यात बविआचे क्षितिज ठाकूर व भाजपचे राजन नाईक यांच्यामध्ये सामना रंगणार आहे, तर बोईसरमध्ये बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील, शिंदेसेनेचे विलास तरे, तर उद्धवसेनेचे डॉ. विश्वास वळवी यांच्यात मुख्य लढत राहणार आहे. यामध्ये कोण बाजी मारते याकडे वसईकरांचे लक्ष लागले आहे.

लोकमत पु. पान क्र. १

# बेकायदा स्टिकर; आता कुठे गेली महिला सुरक्षा?

## भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक चुरशीची बनली असताना भाईंदरमध्ये ठिकठिकाणी मीरा-भाईंदरचा रेवण्णा रेड्डी कोण? आता कुठे गेली महिला सुरक्षा गॅरंटी? अशा मजकुराचे स्टिकर चर्चेचा विषय ठरले आहेत. या स्टिकर प्रकरणी महापालिकेने भाईंदर पोलिस ठाण्यात अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या स्कायवॉकचे पिलर, भाजी मार्केट, सारस्वत बँक व आयसीआयसीआय बँक व नवरंग हॉटेलसमोरील इलेक्ट्रिक जंक्शनवर बेकायदा स्टिकर लावलेले आढळले. कर्नाटकातील अनेक महिलांचे लैंगिक शोषण व त्या शोषणावेळच्या असंख्य व्हिडीओ क्लिप प्रकरण गाजले होते.

ही बाब महापालिकेच्या निदर्शनास आल्यावर पालिका पथकाने हे स्टिकर काढून टाकले. फेरीवाला पथकप्रमुख किरण जाधव यांच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिस ठाण्यात १७ नोव्हेंबर रोजी अनोळखी व्यक्तीविरुद्ध मालमत्ता विद्रुपणनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिस याप्रकरणी तपास करत आहेत.

# २० वीजचोरांवर गुन्हे दाखल

नालासोपारा : मागील १२ महिन्यांपासून बरफपाडा परिसरातील चाळीत वीजचोरी करून वापरणाऱ्या २० जणांवर विरार पोलिस ठाण्यात रविवारी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वीज पथकाने केलेल्या पाहणीत महावितरण कंपनीचे वीज मीटर न घेता अधिकृत वीज कनेक्शन न करता अनधिकृतपणे वीज चोरून वापरली आहे. २० जणांनी ८,९१९ युनिटची १ लाख ९० हजार २९० रुपयांची वीज चोरून महावितरणचे नुकसान केले आहे. सहायक अभियंता राजकुमार कल्लोळकर (५१) यांनी रविवारी तक्रार देऊन विरार पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल केले आहेत.

# महामार्गावर दुचाकी चालकाचा अपघाती मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील मालजीपाडा गावाच्या हद्दीतील वासमारे ब्रीजच्या शेजारी शनिवारी रात्री ट्रेलर चालकाने दुचाकीला धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकी चालकाचा अपघाती मृत्यू झाला आहे. नायगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ट्रेलर चालक भवानी सिंग याने आपल्या ताब्यातील ट्रेलर बेदरकारपणे वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून चालवला आणि समीर शेख याच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक देऊन अपघात केला. या अपघातात समीर शेखला दुखापत झाल्याने मृत्यू झाला. नायगाव पोलिसांनी रविवारी ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पू. पान क्र. 2

# बोगस मतदार, काळा पैसा विधानसभा निवडणुकीत रोखा

## पोलिसांना आवाहन : मराठी एकीकरण समितीची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुजरात-राजस्थानमधून बोगस मतदार व काळा पैसा आणला जात असल्याने याप्रकरणी निवडणूक आयोगासह पोलिसांनी कठोर कारवाई करण्याची मागणी मराठी एकीकरण समितीने केली आहे.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील महानगरात खूप मोठ्या प्रमाणात बोगस मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. मीरा-भाईंदर मतदारसंघात नजीकच्या काही महिन्यातच ६८ हजारपेक्षा अधिक मतदारांची नवीन नावे नोंदणी झाली आहे. याचे आकलन केले असता, ६० टक्के नावे बोगस असल्याचे समजते. ही बहुतेक नावे धारण करणारी मंडळी गुजरात, राजस्थान राज्यातून निवडणुकीच्या दिवशी येणार आहे.



- दि. १९ ते २० रोजी महाराष्ट्र राज्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर बोगस मतदार आपल्या राज्यात शेजारच्या राज्यातून प्रवेश करणार असल्याचे माहिती खात्रीलायक सूत्रांकडून समजली आहे, असे एकीकरण समितीचे गोवर्धन देशमुख, प्रदीप सामंत यांनी तक्रारीत स्पष्ट म्हटले आहे.

### मोठी आर्थिक उलाढाल होण्याची शक्यता

- बोगस मतदान होण्यासाठी, मतदारांना प्रलोभने दाखवण्यासाठी, मोठी आर्थिक उलाढाल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया स्वच्छ व पारदर्शक ठेवण्यासाठी वरील दोन दिवसंच्या कालावधीत, गुजरात, राजस्थान राज्यातून महाराष्ट्रात प्रवेश करणाऱ्या खासगी (बस) प्रवासी वाहनांवर बंदी घालण्यात यावी. छोट्या चारचाकी वाहनांची व त्यामधील प्रवाशांची कसून चौकशी करावी. त्यांचा राज्यात प्रवेश करण्याचा हेतू तपासून घ्यावा.
- पश्चिम द्रुतगती महामार्ग व डांग प्रांतातून नाशिकच्या दिशेने येणाऱ्या मार्गावर विशेष तपासणी चौक्या उभारणे आवश्यक आहे. राज्यातील निवडणूक प्रक्रिया बोगस मतदानाने व आर्थिक प्रलोभनाने प्रभावित होऊ नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. मीरा-भाईंदरच्या २०१४ सालच्या विधानसभा निवडणुकी वेळी राई खाडी येथे गुजरातच्या नागरिकांची असंख्य बनावट पॅनकार्ड, यादी आदी सापडले होते, असेही सामंत यांनी म्हटले आहे.

लोकमत पान क्र. 4

# आलिशान गृहसंकुलात क्रिकेटवरून रहिवाशांमध्ये राडा

## मारहाणीत एकाचे दात तोडले : पाच जणांवर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडमधील आलिशान एमआयसीएल आराध्या हायपार्क या गृहसंकुलात क्रिकेटवरून रहिवाशांमध्ये राडा झाला. एकास बेदम मारहाण करून त्याचे दात तोडल्याप्रकरणी पाच रहिवाशांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आराध्या हायपार्क या गृहसंकुलातील रहिवाशांमध्ये आपापसात क्रिकेट प्रीमियर लीगचे संघ तयार करून त्यांचा व्हॉट्सॲप ग्रुप केला.निखिल जांबवलीकर यांनी काशिमीरा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, क्रिकेटच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये चर्चेदरम्यान सुरेंद्र थांधिया यांनी तुमच्यात दम असेल तर खाली भेटण्यासाठी या, असा संदेश टाकला.

### धक्का नंतर मारहाण

- निखिल हे क्रिकेटचा सराव करण्यासाठी गृहसंकुलाच्या आवारात आले असता थांधिया यांनी त्यांना शिवीगाळ केली. थांधिया यांनी निखिल यांना मागून धक्का मारून खाली पाडले.
- यावेळी इम्रान अन्सारी यांच्या अंगावर निखिल पडले. त्याचा राग येऊन इम्रानने हातातील कड्याने निखिल यांना तोंडावर मारहाण केली.
- त्यात निखिल यांचे दोन दात तुटले व जखम झाली, तर थांधियासह आशिष सावंत, युगांत कदम आणि सोहेल सय्यद यांच्यासह थांधिया यांनी निखिल यांना लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ केली. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा नोंदविला आहे.

CamScanner

लोकमत पृ. पान क्र.4

## आचोळ्यात घरफोडी



नालासोपारा : नालासोपारा पूर्वेकडील आंबावाडी परिसरातील वसुंधरा निवास येथे राहणाऱ्या मालन सणस (४०) यांच्या घरी लाखोंची घरफोडी झाली आहे. चोरट्यांनी बंद घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश करत १ लाख ५९ हजार ६२० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली आहे. आचोळे पोलिसांनी रविवारी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## माणिकपूरमध्ये लाखोंची चोरी

नालासोपारा : वसई पूर्वेकडील दिवाण अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या उमा शर्मा (वय ३७) यांच्या घरी १५ ते १६ नोव्हेंबरदरम्यान लाखोंची चोरी झाली आहे. आरोपीने घराचा दरवाजा चावीने उघडून घरात प्रवेश केला. तसेच कपाटातील ड्रॉव्हरमधून २ लाख १ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. माणिकपूर पोलिसांनी रविवारी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.



ठाणे जिल्ह्यातील ओवळा-माजीवाडा मतदारसंघातील विविध उमेदवारांनी सोमवारच्या शेवटच्या दिवशी मीरा-भाईंदरमध्ये प्रचारावर भर दिला होता.

# ओवळा-माजीवडात शेवटपर्यंत प्रचारावर भर

## रॅलीसह घेतल्या लोकांच्या गाठीभेटी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : ओवळा-माजीवडा मतदारसंघाचा मोठा भाग मीरा-भाईंदर शहरात येत असल्याने सोमवारी निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी शिंदेसेनेचे उमेदवार प्रताप सरनाईक यांनी रॅली व लोकांच्या भेटीगाठी घेतल्या.

२००९ पासून २०२४ असे सलग तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले प्रताप सरनाईक यंदा चौथ्यांदा विधानसभेची निवडणूक लढवत आहेत. सोमवारी सकाळपासून आ. सरनाईक व समर्थकांनी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, मंगल पांडे उद्यान, अमृतवन उद्यान, सावित्रीबाई फुले उद्यान, रामदेव पार्क उद्यान, सेवन स्क्वेअर शाळेसमोरील २४२ आरक्षित उद्यान, बाळासाहेब ठाकरे उद्यान, नवघर गाव जुने तलाव उद्यान, लोकमान्य टिळक हॉल, बाबा आमटे योग हॉल, रामलीला उद्यान आदी ठिकाणी भेट दिली. बाइक रॅलीद्वारे लोकांशी संपर्क साधला.

उद्धवसेनेचे नरेश मणेरा हे आ. सरनाईक यांच्याविरुद्ध मैदानात आहेत. मणेरा व शिवसैनिकांनीही गेल्या काही दिवसांपासून रॅली, पदयात्रा आदींच्या माध्यमातून प्रचार चालविला होता. मणेरा यांनी परिवर्तनाची हाक देत आ. सरनाईक यांच्यावर आरोप आणि टीका केली होती.

शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ भव्य पुतळा, मेट्रो व त्याखाली उड्डाणपूल, पाणी योजना, नाट्यगृह, मोफत रुग्णालय, विविध भवन, काँक्रीट रस्ते, घोडबंदर किल्ला पुनर्विकास, सांस्कृतिक, कला आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, बससेवा आदी विकासकामे केल्याचे सांगत मणेरा यांच्या आरोपांना सरनाईक यांनी प्रत्युत्तर दिले.

लोकमत पु.पान क्र. ५

# मीरा-भाईंदरमध्ये थांबला अधिकृत प्रचाराचा धुरळा

## विविध रॅलींमुळे सोमवारी चौक, रस्ते गेले गजबजून

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** विधानसभा निवडणुकीच्या अधिकृत प्रचाराची अंतिम मुदत सोमवार, १८ नोव्हेंबरच्या सायंकाळी ५ वाजेपर्यंत असल्याने मीरा भाईंदरमध्येही अधिकृत प्रचार संपला आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन केले. शहरात सोमवारी वाहनांच्या विविध रॅलींमुळे रस्ते घोषणांनी गजबजून गेले होते.

सोमवारी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी प्रामुख्याने अपक्ष उमेदवार आ. गीता जैन, काँग्रेसचे उमेदवार माजी आ. मुझफ्फर हुसेन व भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहतांसह अन्य उमेदवारांनी वाहनांची रॅली काढली होती. त्यामुळे मतदारसंघात जिकडे तिकडे रॅलीमुळे रस्ते विविधरंगी झेंडे व कार्यकर्त्यांनी गजबजून गेले होते.



मीरा-भाईंदर मतदारसंघात प्रचाराच्या अखेरच्या दिवशी सकाळपासून सर्व उमेदवारांनी रॅली काढून शक्तिप्रदर्शन केले.

लोकांशी जास्तीत जास्त संपर्क साधण्यासह प्रचारात राहिलेला परिसर उरकून घेण्यावरही काहींनी भर दिला. आ. जैन, मुझफ्फर व मेहता यांच्यात मुख्यत्वे त्रिकोणी लढत असली तरी मनसेचे संदीप राणे, माजी उपनगराध्यक्ष अरुण कदम व भाजपचे बंडखोर हंसुकुमार पांडेय हे मतांची कशी जुळवाजुळव करतात, हेही पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. अनेक राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री प्रचारासाठी आले. सभा व प्रचार मुख्यत्वे एकमेकांवर आरोप-टीका करण्यात रंगला.

पुढारी पान क्र. १

# माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक

## हल्ल्यामागे भाजप; देशमुखांचा आरोप

**काटोल : पुढारी वृत्तसेवा**

राज्याचे माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांच्या गाडीवर काटोल-जलालखेड मार्गावरील बेलफाट्याजवळ काही व्यक्तींनी सोमवारी रात्री दगडफेक केली असून, या घटनेत अनिल देशमुख हे जखमी झाले आहेत.



काटोल रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना नागपूरला हलविण्यात आले आहे.

नागपुरातील नरखेड येथे सांगता सभा आटोपून देशमुख हे काटोल येथे येत होते. त्यावेळी जलालखेडा रोडवरील बेलफाट्याजवळ काही अज्ञातांनी त्यांच्या कारवर मोठ्या प्रमाणात दगडफेक केली. या घटनेत देशमुख यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. हा हल्ला नेमका कुणी केला? आणि हल्ल्यामागचे कारण काय? याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. मात्र, या हल्ल्यामागे भाजपचा हात असल्याचा देशमुख यांनी केला आहे.

**हा निवडणूक स्टंट : भाजप**

अनिल देशमुख यांचा मुलगा व काटोलचे शरद पवार गटाचे उमेदवार सलील देशमुख यांचा पराभव समोर दिसायला लागल्याने अनिल देशमुख यांनी केलेला हा निवडणूक स्टंट असल्याची टीका भाजप नेते अविनाश ठाकरे यांनी केली आहे. सहानुभूती मिळवण्यासाठी अनिल देशमुख यांनी स्वत:च्या कार्यकर्त्यांकडून गाडीवर हल्ला करवून घेतला. पराभव पचवू शकत नसल्याने त्यांनी स्टंटबाजी केली, असा आरोप ठाकरे यांनी केला आहे.

पुढारी पू. पान क्र. १

# ५० लाखांच्या बनावट नोटा जप्त

## मिरा रोड येथून गुजरातमधील तरुणाला अटक

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोड येथून मध्यवर्ती गुन्हे शाखेने पन्नास लाखांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी गुजरातमधील एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. या नोटा कुठे छापल्या आणि कुठे वितरित केल्या जाणार होत्या, त्याचा पोलीस तपास सुरू आहे.

शनिवारी काशिमिरा येथे एक तरुण बनावट नोटा विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मुन्शी कंपाउंड येथे सापळा लावून आर्यन जाबूचा (१९) या तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडील बॅगेत ५३ नोटांची बंडले आढळली. त्यामध्ये एकूण ५१ लाख ७१ हजारांच्या नोटा आढळून आल्या. हा तरुण मूळ गुजरात राज्यातील भावनगर येथील असून याचा तपास करत आहोत, अशी माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी दिली.

या आरोपीने ठाण्यातील एका व्यक्तीने या नोटा विक्रीसाठी दिल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलीस त्याच्या दाव्याची पडताळणी करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून हा तरुण शहरात बनावट नोटा विक्रीसाठी आला होता. मात्र या बनावट नोटांच्या निवडणुकीशी संबध नसल्याचे राख यांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख, पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोलीस उपनिरीक्षक हितेन्द्र विचारे आदींच्या पथकाने केली.

## पुण्यनगरी पान क्र. १

# मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाण्यास मनाईच

### उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्रावर मोबाईल नेण्यास परवानगी देण्यात यावी, तसे आदेश निवडणूक आयोगाला द्या, अशी मागणी करणाऱ्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने निवडणुका पारदर्शक, निष्पक्षपणे व सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा देत याचिका फेटाळून लावली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे निवडणुकीत मतदारांना मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाता येणार नाही.



मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतरापर्यंत मोबाईल वापरण्यास निवडणूक आयोगाने बंदी घातली आहे. या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिक तसेच वयोवृद्ध महिलांना मतदान केंद्रावर आपल्या नातेवाईकांशी संपर्क साधता येत नाही, त्यामुळे त्यांची गैरसोय होते. एवढेच नव्हे तर ओळखपत्र व इतर कागदपत्रे मतदान केंद्रावर नेणे अडचणीचे जाते. त्यामुळे सरकारच्या डिजी लॉकर या मोबाईल सेवेचा त्या ठिकाणी वापर करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करत अॅड. उजाला यादव यांनी अॅड. जगदीश सिंग यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी निवडणूक आयोगाच्या वतीने ज्येष्ठ वकील अॅड. आशुतोष कुंभकोणी आणि अॅड. अक्षय शिंदे यांनी याचिकेलाच जोरदार आक्षेप घेतला.

मोबाईल मतदान केंद्रापर्यंत नेण्यात आल्याने अनेक गैरप्रकार झाल्याचे उघड झाले आहे. त्याला आळा घालण्यासाठी आणि निवडणुका पारदर्शक, निष्पक्षपणे व सुरळीत पार पाडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसा निवडणूक आयुक्तांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. याकडे न्यायालयाचे लक्ष वेधताना याचिका फेटाळण्याची विनंती केली. खंडपीठाने याची दखल घेतली. निवडणूक आयोगाचा निर्णय बेकायदा आणि मनमानी नाही. मतदान केंद्रावर मोबाईल फोन घेऊन जाण्यास मनाई करण्याचा आयोगाचा निर्णय योग्य असल्याचे स्पष्ट करत याचिका फेटाळून लावली.

## पुण्यनगरी पु. पान क्र. 7

# गुजराती, उत्तर भारतीय मतांवर आता मदार

### नालासोपारा निवडणुकीत तिरंगी लढतीची शक्यता

**वसई** : मोठ्या संख्येने एकगठ्ठा मते असणाऱ्या गुजराती आणि उत्तर भारतीय मतांवर नालासोपाऱ्यातील उमेदवारांचे भवितव्य अवलंबून आहे. नालासोपारा मतदारसंघातून २००९, २०१४ आणि २०१९ असे सलग तीनवेळा बहुजन विकास आघाडीचे क्षितिज ठाकूर निवडून आले होते. २००९ मध्ये क्षितीज ठाकूर, शिवसेनेचे शिरीष चव्हाण आणि मनसेचे विवेक केळुस्कर यांच्यात तिरंगी लढत झाली होती. त्यावेळी तब्बल ४१ हजार मतांनी क्षितीज ठाकूर यांनी शिरीष चव्हाण यांचा पराभव करत पहिल्यांदा आमदारकी पटकावली.

त्यानंतर २०१४ ला भाजपचे राजन नाईक आणि शिवसेनेचे शिरीष चव्हाण यांनी ठाकूर यांना लढत दिली होती. त्यावेळी मतांची विभागणी होऊन राजन नाईक यांना ६० हजार, तर शिरीष चव्हाण यांना ४० हजार मते मिळाली होती. शिवसेना-भाजपाच्या उमेदवारांच्या बेरजेपेक्षा १३ हजार मते म्हणजे दुसऱ्या क्रमांकाच्या उमेदवारापेक्षा ५३ हजार मते जास्त मिळवून क्षितीज ठाकूर यांचा विजय झाला होता. मागील निवडणुकीत एन्काऊंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांना ठाकूर यांच्याविरोधात लढण्यासाठी पाचारण करण्यात आले होते.त्यावेळी शिवसेनेतून उमेदवारी करताना शर्मा यांनी लढत देत १ लाख ६ हजार मते मिळवली होती. मात्र त्यांच्यापेक्षा ४३ हजार मते जास्त मिळवून क्षितीज ठाकूर यांनी शर्मा यांचा पराभव केला होता. दरम्यान, तिन्ही प्रमुख पक्षाच्या उमेदवारांमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असली तरीही नालासोपारा विधानसभा मतदारसंघात या उमेदवारांचे भवितव्य गुजराती आणि उत्तर भारतीय मतांवर असेल, असे जाणकारांचे म्हणणे आहे.



CamScanner

पुण्यनगरी पू. पान क्र. 4

# कांदळवन क्षेत्रात केला जातोय माती भराव


## ▌आचारसंहिता काळात महसूल, महापालिकेसह पोलिसांचे होतेय दुर्लक्ष

**▌मीरारोड :** मीरा भाईंदर महापालिका क्षेत्रात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याचा फायदा घेत भूमाफिया मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाले आहेत. विविध भागांत सीआरझेड कांदळवन परिसरात माती भराव करून तिवरांच्या झाडांची कत्तल करत असल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीचे कामकाज असल्याचे कारण देत महसूल, महापालिका व पोलीस प्रशासन हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे आरोप नागरिक करत आहेत.

मीरा भाईंदर शहरात काही महिन्यांपासून कांदळवन क्षेत्रात व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात माती भराव केला जात आहे. भरणी माफियांच्या बेकायदा डेब्रिज आणि माती, गाळाच्या भरणीमधून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. शिवाय भूखंड तयार करून दिले जातात. त्यामुळे शहरात राजरोस बेकायदा डेब्रिज, मातीची वाहतूक करणारे फोफावले आहेत. तसेच अगदी रस्ता, खाडी, नाला, कांदळवन क्षेत्र, सीआरझेड, इको सेन्सेटिव्ह क्षेत्र इ. प्रतिबंधात्मक क्षेत्रात सर्रास भरणी केली जात आहे.

सद्यस्थितीत काशीमीरा परिसरातील पेणकरपाडा येथील कांदळवन क्षेत्रात मीरा-भाईंदर महापालिकेनेच ठेकेदारास सांगून भरणी करायला लावली व त्याचे सपाटीकरण केले. चेणे येथे ठाणे घोडबंदर रस्त्यावर असलेल्या बसस्टॉपच्या पाठीमागे कांदळवन क्षेत्रात सातत्याने तक्रारी होऊनही पोलीस, पालिका व महसूल विभागाच्या संगनमताने भरणी सुरू असून, कांदळवन नष्ट होत आहे. मीरा रोड पश्चिम, भाईंदर पश्चिम भागात भरणी माफिया कार्यरत आहेत. जाफरी खाडी क्षेत्र, वसई खाडी किनारा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ असलेल्या भागात भरणी माफियांनी भरणी करत आहेत. तसेच पोलीस उपायुक्त कार्यालयासमोर असलेल्या सहकार प्रीमियम इमारतीच्या पाठीमागे मोठ्या प्रमाणात हजारो ब्रास भरणी सुरू आहे. त्याठिकाणीसुद्धा पर्यावरणाचा ऱ्हास करून तिवरांच्या झाडांची कत्तल सुरू आहे. या भरणी माफियांना राजकारण्यांसह महसूल, पालिका व पोलीस प्रशासन, तसेच वनविभाग व कांदळवन विभाग यांचा आशीर्वाद असल्याशिवाय माती भराव करण्याचे धाडस करू शकणार नाहीत, असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. या भरणी माफिया विरोधात जागरूक नागरिकांनी तक्रारी दिल्या आहेत. गुन्हा दाखल करून बेकायदा भरणी थांबवण्याची जबाबदारी प्रशासनाची असतानाही राजरोस भरणी करत आहेत. महसूल विभागाकडून महापालिका व पोलिसांचीही जबाबदारी असल्याचे सांगितले जाते.

**■ मौजे चेणेचे तलाठी ललित सातपुते यांनी आमच्याकडे मनुष्यबळ नसल्याने कारवाई करू शकत नाही. तर भरणी झाल्यानंतरही त्याचा अहवाल अपर तहसीलदार यांना पाठवतो. नंतर कारवाई होईल. असे उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. याप्रकरणी त्यांची जबाबदारी निश्चित करून जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी गो ग्रीन फाउंडेशन व पर्यावरणप्रेमींनी केली आहे.**



लोकसत्ता पू. पान क्र. 4

# कुंडात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई पूर्वेच्या भालिवली येथील कुंडात पोहण्यासाठी गेलेल्या दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. घरात न सांगता हे दोन्ही तरूण या कुंडाच्या परिसरात फिरण्यासाठी गेले होते, असे सांगण्यात येत आहे.

तुषार बेनकुड (२१) हा नालासोपारा पश्चिमेच्या यशवंत गौरव येथे आपल्या कुटुंबियासमवेत रहात होता. शुक्रवारी संध्याकाळी मुंबईतील कुर्ला येथे राहणारा त्याचा मित्र पवन बोडके (१९) त्याला भेटायला आला होता. दोघेही घरी न सांगता दुचाकीने फिरायला गेले होते. बराच वेळ मुलगा घरी न आल्याने तुषारचे वडील चंद्रकात बेनगुडे यांनी शोधाशोध सुरू केली.

तुषारचे मोबाइल लोकेशन काढले असता ते वसई पूर्वेच्या भालिवली गावाजवळ आढळले. स्थानिकांच्या मदतीने शोध घेतला असता त्या परिसरातील एका नदीजवळ त्यांची दुचाकी आढळली. पुढे साधारण दीड किलोमीटर चालत गेल्यावर पाण्याचे कुंड दिसले. स्थानिक आदिवसांनी पाण्यात उडी मारून शोध घेतला असता पवनचा मृतदेह आढळला. मात्र तुषार सापडला नव्हता. शनिवारी तुषारच्या वडिलांनी याबाबत मांडवी पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी शनिवारी रात्री शोध घेऊन नंतर तुषारचा मृतदेह काढला. कुंडातील पाण्यात दोन्ही तरुण पोहण्यासाठी उतरले होते. मात्र पोहता येत नसल्याने बुडून त्यांचा मृत्यू झाला. या दोघांची बॅग अथवा कपडे मात्र आढळले नाही, अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार वाल्मिक हेंबाडे यांनी दिली.

लोकसत्ता पु.
पान क्र. ३

# भाजपकडून देशाला तोडण्याचे काम

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची पंतप्रधान मोदींवर टीका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** भाजप नेते योगी आदित्यनाथ हे मागील काही दिवसांपासून 'बटेंगे तो कटेंगे'ची भाषा करीत आहेत. देशाला तोडण्याचे काम भाजप, राष्ट्रीय सेवा संघ आणि योगी यांनी केले असल्याचा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सोमवारी महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील व संदीप पांडे यांच्या प्रचारार्थ माणिकपूर येथील मैदानात स्वाभिमान सभा पार पडली. या सभेसाठी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे वसईत आले होते.

मल्लिकार्जुन खरगे यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली. नरेंद्र मोदी हे खोटी आश्वासने गोरगरिबांना देऊन त्यांना लुटण्याचे काम करीत आहेत. मोदी यांनी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याऐवजी त्यांनी त्यांच्या मित्रांचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले. आज पंतप्रधानांना देशातील समस्या सोडवण्यासाठी वेळ नाही, मणिपूरमध्ये दंगे सुरू असताना त्याठिकाणी पहायला वेळ नाही मात्र परदेश दौरे करण्यासाठी वेळ आहे. अशा शब्दात खरगे यांनी मोदींवर टीकास्त्र सोडले. काँग्रेसच्या काळात ज्या विविध योजना व विकास कामे झाली ती पुसून टाकण्याचे काम मोदी सरकार करीत आहे, असा आरोप ही त्यांनी केला आहे.

काँग्रेस हे तोडण्याचे नाही तर राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेमधून जोडण्याचे काम सुरू आहे. आपल्याला देशाचे संविधान वाचवायचे आहे. याशिवाय एकता टिकवायची आहे म्हणून महाविकास आघाडीच्या बाजूने उभे राहा, असे आवाहन खरगे यांनी केले आहे.

### आश्वासनांची घोषणा

महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सर्व प्रथम २ लाख ८० हजार जणांना रोजगार देण्यासाठी प्रयत्न सुरू करणार. डिसेंबरपासूनच त्याची भरती प्रक्रिया सुरु केली जाईल. याशिवाय महालक्ष्मी योजनेतून प्रतिमहिना तीन हजार, महिलांसाठी मोफत बस प्रवास, सहा गॅस सिलिंडर प्रत्येकी ५०० रुपयांत उपलब्ध करून देणार, १०० युनिट वीज माफ, शेतकऱ्यांचे ३ लाखांपर्यंत कर्ज माफ, जातीय जनगणना करून आरक्षण, आरोग्य विमा अशा विविध योजना राबविल्या जातील असे आश्वासन खरगे यांनी वसईतील जनतेला दिले आहे.

### राज्य सरकारवर टीका

भाजपने ईडी, सीबीआय अशा धमक्या देऊन राज्यातील सरकार तोडली आहेत. या भीतीने अनेक नेत्यांनी आपल्या पक्षासोबत गद्दारी करून भाजपसोबत जाऊन गुलाम बनले आहे. अशा शब्दांत खरगे यांनी टीका केली.

---

# मिरा-भाईंदर मतदारसंघात चुरस

## नरेंद्र मेहता यांच्याविरुद्ध मुजफ्फर हुसेन यांच्यात मुख्य लढत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मिरा भाईंदर मतदारसंघात सुरवातीला तिरंगी वाटणाऱ्या लढतीमुळे कमालीची चुरस निर्माण झाली होती. मात्र प्रचाराच्या टप्प्यात प्रचार सभांना मिळणारा प्रतिसाद पाहता महायुतीचे उमेदवार नरेंद्र मेहता आणि महाविकास आघाडीचे उमेदवार मुजफ्फर हुसेन यांच्यात प्रामुख्याने लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर हा मतदारसंघ सर्वात लक्षवेधी ठरला आहे. विद्यमान आमदार गीता जैन आणि माजी आमदार नरेंद्र मेहता या दोघांनी महायुतीतर्फे तिकिटासाठी दावा केल्याने हा मतदारसंघ चर्चेत होता. अखेर भाजपने माजी आमदार नरेंद्र मेहता भाजपाशी एकनिष्ठ असल्याने तिकिट दिले. त्यामुळे गीता जैन पुन्हा अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या. २०१९ मध्ये देखील त्या अपक्ष म्हणून निवडणूक लढवून जिंकून आल्या होत्या. मिरा-भाईंदर हा मतदारसंघ भाजपाचा बालेकिल्ला मानला जातो. गुजराती, मारवाडी, जैन आणि उत्तर भारतीय ही भाजपची पारंपरिक मते. त्यांची या मतदारसंघात संख्या मोठी आहे. गीता जैन या मूळ भाजपच्या. त्या २०१९ मध्ये भाजपच्या मतांवर जिंकून आल्या होत्या. जिंकून आल्यानंतर त्यांनी भाजपऐवजी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाला पाठिंबा दिल्याने भाजपातून नाराजी होती. आता त्यांनी पुन्हा भाजपच्या मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी विविध धार्मिक मुद्दे हातात घेतले होते. त्यामुळे नरेंद्र मेहता आणि गीता जैन यांच्यात भाजपच्या पारंपरिक मतांचे विभाजन होणार असल्याचे सांगितले जात होते. परंतु आता या मतांचे फारसे विभाजन होणार नसल्याचे दिसत आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुजफ्फर हुसेन यांच्यामुळे तिरंगी लढत अपेक्षित होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला प्रचार आणि नागरिकांचा प्रतिसाद पाहता या मतदारसंघात आता मेहता आणि मुजफ्फर हुसेन यांच्यात लढत बघायला मिळत आहे. मात्र मुजफ्फर हुसेन यांना विजयासाठी इतर समाजाच्या मोठ्या मतांची गरज आहे. ते आव्हान त्यांच्यासाठी कठीण आहे.


मेहता यांच्यासाठी भाजपाची यंत्रणा कार्यरत आहे. त्यांनी बंडखोरांना शांत केले असून भाजपबरोबर महायुतीचे सर्व घटक पक्ष प्रचारात सक्रीय आहे. आगामी महापालिका निवडणुकीत अनेकांना नगरसेवक बनायचे असल्याने त्यांना आपल्या विभागात भाजपची ताकद दाखवणे भाग आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्ते, माजी नगरसेवक कामाला लागल्याचे दिसून येत आहे.

CamScanner

N.B.T. पान क्र. 2

# इस साल चिंचोटी झरने के पास कोई हादसा नहीं हुआ

■ निज संवाददाता, वसई



वसई-विरार में इस बारिश के सीजन में कोई हादसा नहीं हुआ। हर साल पर्यटन स्थलों पर कई घटनाएं होती हैं, लेकिन इस बार नायगांव पुलिस ने तुंगारेश्वर की पहाड़ियों पर स्थित चिंचोटी झरने के पास लोगों को जाने पर प्रतिबंध लगा दिया था। सोशल मीडिया के जरिए जागरूकता अभियान चलाए, नोटिस बोर्ड लगाए और गश्त भी बढ़ा दी गई थी। इससे हादसों को रोकने में सफलता मिली।

**पुलिस की सतर्कता से कई हादसे टले**

दरअसल, चिंचोटी झरना मुंबई-अहमदाबाद हाइवे के पास चिंचोटी गांव से लगभग 15 किमी दूर तुंगारेश्वर पहाड़ियों पर है। यहां बारिश के समय ऊंची पहाड़ियों से पानी बहुत तेजी से गिरता है। बारिश के सीजन में यहां हर साल चार से पांच लोगों की डूबने से मौत होती है। साल 2023 में पिकनिक मनाने आए चार युवकों की डूबने से मौत हो गई थी। वर्ष 2018 में भी 30 युवक झरने के तेज बहाव में फंस गए थे। एनडीआरएफ की टीम ने सभी लोगों को हेलिकॉप्टर की मदद से रेस्क्यू किया था। हालांकि एक युवक तेज बहाव में बह गया, जिससे उसकी मौत हो गई थी।

## ट्रेलर-बाइक की टक्कर में युवक की हुई मौत

■ निसं, वसई: मुंबई-अहमदाबाद हाइवे के पास स्थित बापाने में एक ट्रेलर ने बाइक को जोरदार टक्कर मार दी। इस हादसे में बाइक चालक की मौत हो गई। नायगांव पुलिस स्टेशन से मिली जानकारी के अनुसार, शनिवार देर रात बापाने के पास एक तेज रफ्तार ट्रेलर ने बाइक को टक्कर मार दी। इस हादसे में बाइक चालक समीर शेख की मौत हो गई। पुलिस ने आरोपी चालक भवानी मदन सिंह को गिरफ्तार कर लिया है।

# महाराष्ट्र में ईडी का डर दिखाकर बीजेपी ने बनाई सरकार: मल्लिकार्जुन खरगे

### कांग्रेस अध्यक्ष ने वसई और नालासोपारा सीट के उम्मीदवारों का किया प्रचार

■ निसं, वसई: कांग्रेस पार्टी के वरिष्ठ नेता और राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे ने सोमवार को वसई और नालासोपारा सीट के उम्मीदवारों के प्रचार के लिए वसई-पश्चिम में सभा को संबोधित किया। इस दौरान उन्होंने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पर हमला बोला। उन्होंने कहा कि मोदी और अमित शाह ने महाराष्ट्र के नेताओं को ईडी का डर दिखाकर सरकार बनाई है। यह खोखे वाली सरकार है। महाराष्ट्र को आगे बढ़ाना है, तो महायुति की सरकार को हराना होगा।

**खरगे ने कहा, मोदी ने इतनी महंगाई बढ़ा दी है कि गरीबों का जीना हराम हो गया है**



मल्लिकार्जुन खरगे ने वसई में सभा को संबोधित किया।

इस दौरान, खरगे ने कांग्रेस के चुनावी वादे दोहराए। उन्होंने कहा कि महाविकास आघाडी जातिवाद की राजनीति नहीं करती है। हमारी पार्टी में हर समुदाय के लोग हैं। उन्होंने मोदी पर निशाना साधते हुए कहा कि मोदी दुनिया के सबसे बड़े झूठे इंसान हैं, इसलिए मैंने उनका नाम झूठों का सरदार रखा है। मोदी ने इतनी महंगाई बढ़ा दी है कि गरीबों का जीना हराम हो गया है। उन्होंने उत्तर प्रदेश के मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ के लिए कहा कि यूपी के एक अस्पताल में बच्चे जलकर मर गए और योगी महाराष्ट्र में आकर कहते है कि बटेंगे, तो कटेंगे। काटने का काम तो बीजेपी और आरएसएस करती है। इस दौरान, दोनों विधानसभा के उम्मीदवार विजय पाटील, संदीप पांडे और आघाडी के पदाधिकारी मौजूद थे।